# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः11.06.2024** **वारःमंगळवार**

1)केंद्रीय मंत्रिमंडळाचं खातेवाटप जाहीर-राजनाथ सिंह, अमित शहा, नितीन गडकरी, निर्मला सीतारामन यांच्यासह अनेक वरिष्ठ मंत्र्यांची खाती कायम

2)अश्विनी वैष्णव यांच्याकडे रेल्वेबरोबरच माहिती आणि प्रसारण

मंत्रालय; तर शिवराजसिंग चौहान यांच्याकडे कृषी मंत्रालयाची जबाबदारी

3) मुरलीधर मोहोळ यांच्याकडे सहकार तसंच नागरी विमान वाहतूक राज्य मंत्री पदाचा कार्यभार

4) केंद्राकडून किसान सन्मान योजनेचा सतरावा हप्ता जारी

5) प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत तीन कोटी अतिरिक्त घरं बांधण्याचा केंद्रीय मंत्रिमंडळाचा निर्णय

आणि

6) राज्य विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी ८८ उमेदवारांचे अर्ज वैध

**मंत्रिमंडळ-**

राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारच्या नव्या मंत्रिमंडळाचं खाते वाटप काल जाहीर झालं. यात राजनाथ सिंह यांना संरक्षण, अमित शहा यांना गृह आणि सहकार, निर्मला सीतारामन यांना अर्थ, आणि नितीन गडकरी यांना रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालायांची जबाबदारी देण्यात आली आहे. पीयूष गोयल यांच्याकडे वाणिज्य आणि एस. जयशंकर यांच्याकडे परराष्ट्र व्यवहार, ही पूर्वीची खाती कायम ठेवण्यात आली आहेत. शिवराज सिंह चौहान यांना कृषी, जे पी नड्डा यांना आरोग्य, अश्विनी वैष्णव यांना रेल्वे, तसंच माहिती आणि प्रसारण तर धर्मेंद्र प्रधान यांना शिक्षण, आणि मनोहर लाल यांना ऊर्जा खातं देण्यात आलं आहे.

रामदास आठवले यांच्याकडे यांच्याकडे या नव्या मंत्रीमंडळातही सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण राज्यमंत्री पदाचा कार्यभार असेल.

राज्यातले प्रतापराव जाधव यांच्याकडे आयुष मंत्रालयाचे राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) तसंच आरोग्य कुटुंब कल्याण मंत्रालयाचं राज्यमंत्रीपद, रक्षा खडसे यांच्याकडे क्रीडा आणि युवक कल्याण राज्यमंत्री पदाचा कार्यभार तर मुरलीधर मोहोळ यांच्याकडे सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री पदाचा कार्यभार सोपवण्यात आला आहे.

पंत प्रधान

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल पदभार स्वीकारल्यानंतर सर्वप्रथम प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा सतरावा हप्ता जारी केला. याअंतर्गत एकंदर २० हजार कोटी रुपये वितरीत करण्यात आले असून, त्याचा फायदा नऊ कोटी 30 लाख शेतकऱ्यांना होणार आहे. आपलं सरकार शेतकरी कल्याणासाठी पूर्णपणे वचनबद्ध आहे. त्यामुळे नवीन सरकारचा पहिला निर्णय शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी असल्याचं, पंतप्रधानांनी यावेळी सांगितलं.

कॅबिनेट पंत प्रधान

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत तीन कोटी अतिरिक्त घरं बांधण्याचा निर्णय काल केंद्रीय मंत्री मांडळानं आपल्या पहिल्याच बैठकीत घतेला. 2015पासून ही योजना राबवली जात असून, या अंतर्गत गेल्या दहा वर्षांत एकंदर 4 कोटी 21 लाख घरं  बांधून पूर्ण झाली आहेत.

**<u>विधानपरिषद</u>**

राज्य विधानपरिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाच्या निवडणूकीसाठी छाननीनंतर एकंदर ८८ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत. मुंबई पदवीधर, कोकण विभाग पदवीधर, नाशिक विभाग शिक्षक तसंच मुंबई शिक्षक मतदारसंघ अशा ४ जागांकरता येत्या २६ जून रोजी मतदान होणार आहे. उद्यापर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येतील. १ जुलैला मतमोजणी होणार आहे.

**<u>कोस्टल</u>** रोड

मुंबईतल्या किनारी रस्ता प्रकल्पातल्या मरीन ड्राइव्ह ते हाजी अली मार्गिकेतल्या सहा किलोमीटरच्या भूमिगत बोगद्याचं उद्घाटन काल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झालं. या प्रकल्पांतले  2 टप्पे सुरू झाले असून, उर्वरित तिसरा टप्पा जुलैमध्ये खुला केला जाईल. या प्रवासासाठी पूर्वी ४० ते ५० मिनिटांचा वेळ लागत होता मात्र या बोगद्यामुळे हा प्रवास केवळ ८ मिनिटात होणार आहे. अत्यंत अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरून हा बोगदा करण्यात आला असून रहदारीच्या त्रासातून मुंबईकरांना दिलासा देणारा आहे असं मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि  अजित पवार यावेळी उपस्थित होते.

**<u>अजित पवार</u>**

पावसाच्या आगमनानंतर राज्यात, शेतकरी खरीप पिकांच्या पेरणीच्या तयारीला लागला आहे. यांना आवश्यक प्रमाणात बियाणे, खतांचा पुरवठा करा, तसंच प्रत्येक पात्र शेतकऱ्याला पीक कर्ज मिळण्याची दक्षता घ्या, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल सर्व विभागीय आयुक्तांना दिले. राज्यातील पीक पाण्यासंदर्भात त्यांनी दूरस्थ  माध्यमातून आढावा घेतला. पुरेसा पाऊस पडल्यानंतरच शेतकऱ्यांनी पेरणी करावी, यासाठी कृषी विभागाच्या समन्वयानं जनजागृती करावी, असेही त्यांनी यावेळी सांगितले. आषाढी वारीसाठी मंजूर निधी ताबडतोब वितरित करण्याचे निर्देशही पवार यांनी यावेळी दिले.

**<u>मोहोळ</u>**

पुण्यात गेल्या काही दिवसात झालेल्या पावसामुळे ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणावर पाणी साचल्याने पुणेकरांना अडचणींना सामोरं जावं लागलं होतं, या पार्श्वभूमीवर पुण्याचे खासदार आणि केंद्रीय राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी काल नवी दिल्लीतून दूरस्थ माध्यमातून महापालिका आयुक्त आणि संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली. यावेळी त्यांनी अधिकाऱ्यांकडून सर्व माहिती घेतली आणि त्यांना सूचनाही दिल्या.

**<u>आरोग्य विद्यापीठ</u>**

नाशिकच्या महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठाच्या वतीनं अनेक ऑनलाईन आरोग्य शिक्षणक्रम उपलब्ध करून  देण्यात आले असल्याची माहिती विद्यापीठाच्या कुलगुरू निवृत्त लेफ्टनंट जनरल माधुरी कानिटकर यांनी दिली. विद्यापीठाच्या २६व्या वर्धापन सोहळ्यात त्या काल बोलत होत्या.संशोधन प्रकलपांसाठी विद्यापीठात 'दृष्टी' कक्षाची स्थापना करण्यात आली असून आरोग्य शास्त्रांची माहिती देणारे अद्ययावत 'इक्षणा' संग्रहालय साकारण्यात येत असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

**<u>राष्ट्रवादी काँग्रेस</u>**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये उभी फूट पडल्यानंतर पक्षाचा २५वा वर्धापन दिन काल अजित पवार गटातर्फे मुंबईत आणि शरदचंद्र पवार गटातर्फे पुणे आणि अहमदनगरमध्ये साजरा करण्यात आला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा अभिन्न भाग असल्याचा निर्वाळा, पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांनी मुंबईत षण्मुखानंद सभागृहात झालेल्या मेळाव्यात बोलतांना दिला. तर आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार दिवंगत यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांवर आपण काम करत आहोत; जनतेची सेवा आणि महाराष्ट्राचा स्वाभिमान जपण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत, अशी भावना शरद पवार यांनी पुण्यातील कार्यक्रमात व्यक्त केली. नव्या राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारवर टीका करून आगामी विधानसभा निवडणुकीसाठी सज्ज राहण्याचं आवाहन शरद पवार यांनी अहमदनगर इथल्या कार्यक्रमात कार्यकर्त्यांना केलं.

**कल्याणी नगर वाहन अपघात**

पुण्यातल्या कल्याणी नगर वाहन अपघात प्रकरणी अल्पवयीन मुलाचे पालक विशाल अगरवाल, शिवानी अगरवाल आणि अश्फाक मकानदार या तिघांना १४ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. दरम्यान विशाल आणि सुरेंद्र कुमार अगरवाल यांच्यावर पुण्यातल्या नॅन्सी ब्रम्हा या सोसायटी धारकांची फसवणूक केल्याप्रकरणी हिंजवडी पोलीस ठाण्यात आणखी एक गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**आत्मसमर्पण गडचिरोली**

अनेक हिंसक कारवायांमध्ये सहभागी असलेल्या एका नक्षल समर्थकानं काल गडचिरोली पोलिसांसमोर शरणागती पत्करली. किशोर उर्फ मुकेश पेंटा कन्नाके हा नक्षल समर्थक भामरागड तालुक्यातील नेलगुंडा तालुक्यातला रहिवासी असून राज्य शासनानं त्याच्यावर २ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केलं होतं.

**काळे निधन**

मुंबई क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अमोल काळे यांचं काल अमेरिकेतील न्यूयॉर्क इथं हृदयविकाराच्या धक्क्यानं निधन झालं. ते 47 वर्षांचे होते. अमेरिकेत सुरू असलेल्या टी 20 विश्वचषक स्पर्धेचा सामना पाहण्यासाठी ते गेले होते. त्यांच्याच कार्यकाळात मुंबई संघाने रणजी करंडक जिंकला.

**अपघात**

अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड खर्डा रस्त्यावर बटेवाडी शिवारात एसटी आणि कारमध्ये काल झालेल्या अपघातात दोघांचा मृत्यू झाला आणि तीन जण गंभीर जखमी झाले आहेत. तर जालना जिल्ह्यात दोन भरधाव दुचाकींची समोरासमोर धडक

होऊन झालेल्या अपघातात दोघांचा मृत्यू झाला.

**कोकण रेल्वे**

कोकण रेल्वेचं पावसाळी वेळापत्रक कालपासून लागू झालं असल्याची माहिती कोकण रेल्वेच्या रत्नागिरीतल्या जनसंपर्क अधिकाऱ्यांनी दिली. प्रवाशांनी आपल्या गाडीची वेळ प्रवासापूर्वी तपासून घ्यावी, असं आवाहन कोकण रेल्वेनं केलं आहे.

**पाऊस**

सांगली जिल्ह्यात काल वादळी वारा आणि मेघगर्जनेसह जोरदार पाऊस झाला. सलग पाऊस आणि वाऱ्यामुळे मिरज तालुक्यातील भोसे इथल्या राष्ट्रीय महामार्गालगत असणारा 400 वर्षांपूर्वीचा वटवृक्ष उन्मळून पडला आहे. हा वृक्ष वाचवण्यासाठी झालेल्या आंदोलनानंतर ,राज्य सरकानं राष्ट्रीय महामार्गासाठी वृक्षतोड न करण्याचा नवा कायदा केला होता.

**<u>हवामान</u>**

नैर्ऋत्य मोसमी पावसाची आगेकूच सुरू असून तो राज्याच्या बहुतांश भागात सक्रीय झाल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे. येत्या 24 तासात राज्यात अनेक ठिकाणी पावसाचा अंदाज असून मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार